पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. वैद्यकीय विभाग
क्र. वैद्य/१४/कावि/939/२०१७
दिनांक - 90/०३/२०१७

विषय - **धन्वंतरी स्वास्थ्य योजना अंमलबजावणीबाबत ...**
संदर्भ - दिनांक ०६/०३/२०१७ रोजीची बैठक.

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबिय आणि सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी (पती/पत्नी) यांचेसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु करणेत आली आहे.

योजना सुरु झाल्यानंतर कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक धन्वंतरी योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयांमध्ये उपचार घेत आहेत. धन्वंतरी योजनेमध्ये उपचार घेतलेल्या अधिकारी/कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक यांची संख्या माहे एप्रिल २०१६ ते फेब्रुवारी २०१७ अखेर ५२०३ इतकी झाली असून त्यासाठी रु.२०.८८ कोटी एवढ्या रकमेची बिले प्राप्त झाली आहेत.

योजने अंतर्गत अनेक कर्मचारी किरकोळ आजारासाठी तसेच आवश्यक नसतानाही धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयामध्ये उपचार घेत असल्याचे दिसून येत आहेत. त्याचबरोबर कारण नसताना काही रुग्णालये रुग्णांच्या अनावश्यक तपासण्या करताना दिसत आहेत. अशा कारणांमुळे योजनेमध्ये सुरळीतपणा आणणेचे दृष्टीने काही ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दिनांक ०६/०३/२०१७ रोजी आमदार मा.लक्ष्मण जगताप, मा.आयुक्त, मा.अध्यक्ष कर्मचारी महासंघ, मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, धन्वंतरी स्वास्थ्य समिती सदस्य / मनपा अधिकारी यांची बैठक होऊन धन्वंतरी योजनेच्या अंमलबजावणीबाबत चर्चा झाली. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्त यांनी तातडीचे उपचाराव्यतिरिक्त इतर सर्व आजारांसाठी महापालिकेच्या ८ रुग्णालयामार्फत रेफर चिट घेऊन धन्वंतरी अंतर्गत पॅनलवरील रुग्णालयात उपचार घेणेबाबत आदेश दिले आहेत.

त्यानुसार ह्रदय व अस्थिरोग उपचारासंदर्भात वायसीएम रुग्णालयाकडून रेफर चिट घेण्यात यावे. याव्यतिरिक्त मनपाच्या इतर रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विशेष तज्ञांकडून /वद्दनर वै.अ. यांचेकडून इतर आजारासंदर्भात रेफर चिट घेण्यात यावी. तथापि रुग्णाची तपासणी केल्याशिवाय रेफर चिट मिळणार नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये मनपा रुग्णालयाकडून विशिष्ट रुग्णालयाच्या नावाची शिफारस केली जाणार नाही. तसेच परिशिष्ट ड मधील आजारावर शिफारस केली जाणार नाही.

महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी/सेवानिवृत्त कर्मचारी यांनी सदर परिपत्रकाची विशेष गांभिर्याने दखल घेऊन दिनांक १४/०३/२०१७ पासून मनपा रुग्णालयातुन रेफर चिट घेऊनच उपचार घेणेची दक्षता / काळजी घ्यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.

प्रति,

सर्व शाखाप्रमुख

२/- सदरचे परिपत्रक सर्व कर्मचा-यांचे निदर्शनास आणून यावे, परिपत्रक मिळालेबाबत स्थळप्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेणेत यावी. परिपत्रक न मिळालेमुळे उपचार घेता आले नाहीत अशी तक्रार प्राप्त झालेस त्यास संबंधित शाखाप्रमुख जबाबदार राहतील.